**152ND Meeting of Mumbai Metropolitan Region Development Authority**

**Mumbai, February 28, 2022**: The 152nd meeting of the Authority was held today under the chairmanship of Hon. Eknath Shinde, Minister ,Urban Development, Maharashtra State. Various projects and schemes were approved in this meeting. The meeting also approved the revised budget for the year 2021-22 and the original budget for the year 2022-23, outlining the funds required for the implementation of the new projects .

According to the revised estimated for financial year 2021-22, the total income is of Rs. 8672 Crore and expected expenditure is of Rs. 14588.02 Crores. The original budget for year 2022-23, expected income to be received of Rs. 10724 Crore, which Mainly comprise of sources such as income generated from sale of lands plots loan raised from International financial Institute , Sub-debts from State Government for Metro,Income from development charges, TDR etc.In Financial year, 2022-23, the total expected expenditure on various projects is to the extent of Rs. 18404.63 crores.This budget mainly emphasized an implementation of Public Transport and Vital Infrastructural Projects Provide Rs.2111.30 crores . on many new projects such as construction of bridge from Nariman Point to Colaba/ Cuffe Parade, Metro Line 10,11,12, Extension of Eastern Free Way to Thane, Thane Coastal Road, Elevated Road from Anand Nagar to Kharegaon in Thane City, Kalyan Ring Road, Kopri-Patni Road, bride on Gorai Creek, Thane- Borivali Tunnel Link Road etc. Balance allocation is majorly for important Metro corridors and ambitious projects, such as MTHL and other ongoing projects.

The Authority has also granted approval to the linking road from MTHL to Mumbai-Pune Expressway, in Raigad District.

Approval is also granted interchanging and service roads in Chirle Village.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १५२ वी बैठक

**मुंबई, २८ फेब्रुवारी, २०२२ :** श्री. एकनाथ शिंदे, मा. मंत्री नगर विकास, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची १५२ वी बैठक आज संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विविध प्रकल्प व योजनांना संमती देण्यात आली. बैठकीमध्ये प्रगतीपथावर असणा-या तसेच नवीन प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी लागणा-या निधीचा गोषवारा मांडणारा सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पास मंजूरी देण्यात आली.

- सन २०२१-२२ च्या सुधारीत अर्थसंकल्पानुसार एकूण उत्पन्न रु. ८,६७२ कोटी जमा होईल व रु. १४,५८८.०२ कोटी इतका खर्च होईल असा अंदाज आहे. सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात एकूण रु. १०,७२४ कोटी जमा होतील असा अंदाज आहे. त्यात प्रामुख्याने जमीन व भूखंड विक्री पोटी मिळणारा निधी, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून उभारले जाणारे कर्ज, राज्य शासनाकडून मेट्रो करीता मिळणारे दुय्यम कर्ज, शासनाचे अनुदान व विकास हक्क हस्तांतरण इ. अंतर्भूत आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये विविध प्रकल्पांवर होणारा एकूण खर्च रु. १८,४०४.६३ कोटी इतका अपेक्षित आहे. प्रामुख्याने सार्वजनिक वाहतूक व पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर भर असलेल्या या अर्थसंकल्पामध्ये नरिमन पॉईंट ते कुलाबा / कफ परेडला जोडणा-या पुलाचे बांधकाम, मेट्रो मार्गिका १०, ११, १२, पूर्व मुक्त मार्गाचे ठाण्यापर्यंत विस्तारीकरण, ठाणे खाडी किनारी मार्ग, ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत उन्नत मार्ग, कल्याण बाहय वळण रस्ता, कोपरी पटणी रस्ता, गोराई खाडीवर पूल, ठाणे बोरीवली लिंकरोड वरील भूयारी मार्ग इ. अनेक नवीन प्रकल्पांकरिता रु. २१११.३० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. उर्वरीत बहुतांश रक्कमेची तरतूद ही प्रामुख्याने विविध मेट्रो मार्ग तसेच मुंबई पारबंदर छन्नमार्गासारख्या महत्वाकांक्षी व प्रगतीपथावर असणा-या प्रकल्पांकरीता करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये मुंबई पारबंदर प्रकल्प ते मुंबई - पुणे द्रुतगती मार्ग असा थेट जोडरस्ता व चिर्ले येथील उर्वरित आंतरबदलाचे तसेच सेवा रस्त्याची कामे करण्यासाठीच्या रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.